# काळबादेवी स्थानकाची दोन बोगद्यांत उभारणी

• म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो ३ या भूमिगत मार्गिकेतील काळबादेवी हे स्थानक दोन बोगद्यांत वसले आहे. या स्थानकाचे काम झपाट्याने पुढे जात आहे. सर्वाधिक टणक असा खडक फोडून हे स्थानक उभे केले जात आहे.

'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' हा मेट्रो-३ प्रकल्प पश्चिमेकडून मुंबईला उत्तर-दक्षिण असा जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. यातील सीप्झ (सारिपूतनगर-आरे) ते बीकेसी उत्तर हा मार्ग पहिल्या टप्प्यात सुरू होणार आहे. डिसेंबर २०२१ मध्ये हा मार्ग सुरू करण्याचे नियोजन होते. आरे कारशेडसंबंधी प्रकरणामुळे त्याला विलंब झाला. परंतु आता हा मार्ग आता झपाट्याने पूर्ण होत असून डिसेंबर २०२३ पासून पहिला टप्पा सुरू होणार आहे. तर दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ पासून सुरू होणार आहे. त्यामध्येच 'काळबादेवी' या स्थानकाचा समावेश आहे.



हे स्थानक दोन बोगद्यांदरम्यान उभे केले जात असल्याने आगळेवेगळे ठरणार असल्याचे ही मार्गिका उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) म्हटले आहे. एका बोगद्यातून दुसऱ्या बोगद्यात वळण घेऊन हे स्थानक उभे होत आहे.